Acharya Vinoba Bhave Rural Hospital
Sawangi (Meghe) Wardha.

# Harvested Heart of Brain-dead patient Flies from AVBRH, Wardha to Mumbai

First time in the history of Wardha District, a heart from a brain-dead patient was harvested and flown to Mumbai via green corridor from Wardha to Nagpur airport and then from Mumbai Airport to Fortis Hospital at Mulund.

A young 26 year old male resident of Pusad in Yavatmal District Mr. Ashwin Vilas Bansod met with road accident on 4-10-17 and was brought to Acharya Vinoba Bhave Rural Hospital, Sawangi Meghe. The treating Neuro surgeons Dr. Sandeep Iretwar, Dr. Shailendra Anjankar and Intensivist Dr. Virendra Belekar after examination declared him brain-dead and informed the relatives about organ donations. The family though from a very humble and poor background readily showed their willingness for such organ donation. Transplant coordinator Dr. Rupali Naik and Chief Medical Superintendent Dr. Babaji Ghewde informed the Zonal Transplant Coordination Committee about the same and the ZTCC alerted State Transplant Coordination Committee and allotted the organs as per protocol.



A team of doctors from Fortis hospital led by cardiac surgeon Dr. Anvay Muley, Dr. Sandeep Sinha and Dr. Vijay Shetty flew from Mumbai to Nagpur and then to Wardha for harvesting the heart alongwith AVBRH cardiac surgeon Dr. Sachin Kuthe and cardiologist Dr. Satish Khadase. Another team from Dinanath Mangeshkar hospital led by Dr. Vrushali Patil came from Pune and harvested the liver. Dr. Sandeep Choubey, Dr. Sanjay Kolte and Dr. Chandrashekhar Mahakalkar harvested the kidneys and one kidney was transplanted to a patient in AVBRH and other kidney was taken to Wockhardt Hospital, Nagpur. Eyes were also harvested by team of doctors in AVBRH.

The surgery started at 1 pm and heart, liver was taken to Nagpur airport via green corridor arranged by Wardha district police at 7.15 pm. It was taken to Nagpur airport within a record time of 50 mins only. The entire exersice was carried out under able guidance of Hon. Trustee DMIMS Shri. Sagarji Meghe, Hon. Vice chancellor of DMIMS (DU) Dr. Rajiv Borle, CEO of the Hospitals Dr. Sandeep Shrivastava and OSD Mr. Abhyuday Meghe. Team of Anaesthetists and intensivits led by Dr. Sanjyot Ninave, Dr. Jayshree Sen, Dr. Amol Singham and Dr. Roona assisted the surgery. Mr. Rajesh Sawwalakhe, Mr. Manoj Bawane, Mr. Abhay Jaronde, Mr. Mangesh Kulkarni, Chhaya Telrandhe, Ranjana Vihirkar with their Nursing team and Mr. Vijay Khaire with team helped for this entire cause.

The hospital administration is thankful to the SP of Wardha district Nirmaladevi and PSI Mr. Santosh Shegaonkar for providing the green corridor. The Civil Surgeon of Wardha Dr. P. Madavi and ZTCC authorities Dr. Vaibhavari Dani and Dr. Ravi Wankhede guided for this cadaveric organ donation exercise. Dr. Sandeep Shrivastava and Dr. Babaji Ghewde expressed their sincere gratitude towards patients relatives.

# हृदयाचा प्रवास वर्ध्याहुन मुंबईला

सावंगी मेघे येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रूग्णालयात आज दि. ०६.१०.२०१७ रोजी पुन्हा एकदा अवयवदानाची प्रकिया यशस्वीरित्या पार पाडण्यात आली. यात विशेष म्हणजे वर्ध्याहुन पहिल्यांदाच मेंदू मृत व्यक्तिच्या शरीरातील हृदय काढुन ग्रीन कॉरीडॉर व्दारा नागपूर मार्गे विमानाने मुंबईला पाठविण्यात आले.
यवतमाळ जिल्हयातील पुसद येथील रहिवासी असलेला २६ वर्षीय अविवाहीत तरूण अश्वीन विलास बनसोड यांचा दि.०४.१०.२०१७ रोजी अपघात होवून. त्यांच्या मेंदुला जबर मार लागुन बेशुध्द अवस्थेत त्याला सावंगी मेघे येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रूग्णालयात न्युरो सर्जरी विभागात दाखल करण्यात आलेले होते. त्याच्यावर उपचार करणा-या न्युरोसर्जन डॉ. संदीप इरटवार, डॉ. शैलेन्द्र अजंनकर व डॉ. विरेन्द्र बेलेकर यांनी अश्वीन याला पुर्ण तपासणीअंती त्यांच्या मेदुंला जबर मार लागल्यामुळे त्यांचा मेंदु मृताअवस्थेत आहे. अशी माहीती अश्वीनच्या नातेवाईकांना दिली. त्यानंतर डॉ. इरटवार आणि डॉ. अजनंकर यांनी त्यांना अवयवदानाविषयी माहीती दिली. अश्वीन बनसोड हा अतिशय गरीब शेतकरी कुटूंबातील असुन तो मोलमजुरी करीत होता. त्याच्या घरची परिस्थिती अतिशय हलाखीची होती अश्यापरिस्थितीत सुध्दा अश्वीन च्या घरच्यांनी त्याच्या अवयवदानाला जड

अतंकरणाने संमती दिली.
त्यानंतर रूग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधिक्षक डॉ. बाबाजी घेवडे व अवयव प्रत्यारोपन समन्वयक डॉ. रूपाली नाईक यांनी विभागीय प्रत्यारोपण समितीशी संपर्क साधुन पुढील अवयव दान प्रक्रियेला सुरवात केली.
मुंबई येथील फोर्टीस रूग्णालयातील रूग्णासाठी हृदय व दीनानाथ मंगेशकर रूग्णालय पुणे येथील रूग्णांस यकृत देण्याचे ठरले. त्याप्रमाणे मुंबई येथुन हदय शल्य चिकित्सक डॉ. अन्वय मुले, डॉ. विजय शेट्टी व डॉ. संदीप सिन्हा आणि पुणे येथील यकृत प्रत्यारोपन सर्जन डॉ. वृषाली पाटील हे सावंगी येथील रूग्णालयात आज दि. ०६.१०.२०१७ ला दुपारी १२.०० वाजता पोहचले. त्याचप्रमाणे नागपूर येथील वोकार्ट रूग्णालयाचे डॉ. संजय कोलते, डॉ. समीर चौबे व डॉ. राजेश गडे हे किडणी प्रत्यारोपनासाठी पोहचले.
दुपारी ०१ वाजता शस्त्रक्रियेला सुरवात झाली. सायं. ७ वाजेपर्यंत यशस्वीरित्या हृदय, यकृत व एक किडणी काढुन ग्रीन कॉरीडोर व्दारा नागपूर ला अवघ्या ५० मिनीटांमध्ये पोहचविण्यात आले. दुसरी किडणी व डोळे यांच्या प्रत्यारोपनाची शस्त्रक्रिया सावंगी मेघे येथील रूग्णालयांतच करण्यात आली.